मंगळवार दि.२१ मे २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २६३
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

# दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# विसर पडत चाललेल्या सिंदखेड राजा नगरीचा इतिहास आता पुनश्च उलगडू लागला

## राजे लखोजीराव जाधव यांच्या समाधी परिसरात सापडले तेराव्या शतकातील शिवमंदिर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मातृतीर्थ सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोळ असलेले माता जिजाऊंचे माहेर घर हे स्वराज्यातील मानाचे च शहर.. जगातील सर्वात मोठी हिंदू राजाची समाधी सिंदखेड राजा येथे राजे लखोजीराव जाधव यांची आहे. राजे लखोजिराव जाधव व त्यांच्या चार मुलांची हत्या मुस्लिम राजवटीमध्ये करण्यात आली होती त्यानंतर १० वर्षाच्या कालावधी मध्ये रामेश्वर मंदिरा शेजारी राजे लखोजिराव जाधव यांची समाधी बांधण्यात आली. या मध्ये लखोजीराव जाधव यांचे दत्ताजीराव, अचलोजिराव, रघोजीराव व यशवंतराव या चार मुलांच्या देखील समाधी मंदिरात समाधी आहे. इसवीसन १६३० ते १६४० या काळात या समाधी मंदिराचे बांधकाम झाल्याची माहिती समधीवरील तारखेवरून मिळते.





राजे लखुजी जाधव यांच्या समाधी परिसरात खोदकाम काम सुरू असताना तेराव्या शतकातील यादवकालीन पूर्वाभिमूख शिवमंदिर राजे लखुजी जाधव यांच्या समाधी समोर सापडले असुन या ठिकाणची पाहणी अरुण मलिक अधीक्षक पुरातत्व विभाग भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण मंडळ नागपूर आणि त्यांच्या चमूने पाहणी केली आहे. भारतीय पुरातत्त्व विभाग उत्खनन करताना १८ मे रोजी या ठिकाणी यादवकालीन शिवमंदिर उत्खनन करताना सापडले या मंदिरामध्ये महादेवाची मोठी पिंड,व्दारशिला व हे मंदिर मोठ्या दगडाने बांधलेले असून मंदिराखाली दगडी फरशी टाकलेली दिसुन येत आहे. उत्खननात सापडलेल्या मंदिराची स्थापना रामेश्वर मंदिरा सोबत झाली असू शकते, परंतु नंतरच्या काळात हे जमिनी खाली गाडल्यागेले असावे असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. खोदकामात आढळलेल्या मंदिराचा काही भाग माती खाली दबलेला असून. या ठिकाणी अजून उत्खनन केले जाणार आहे,उत्खनन पूर्ण झाल्यानंतरच या मंदिराची रहस्य लोकांसमोर येणार आहेत. भारतीय पुरातत्व विभागाच्या नागपूर येथील सर्वेक्षण अधिकारी सविस्तर या ठिकाणची पाहणी करून माहिती घेत आहेत व याबाबत सविस्तर तपासणी करून या विषयी माहिती देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### उत्खनन होणे गरजेचे

पुरातत्व विभाग जैसे ते काम करतांना दिसते आहे. आजतागात लाखोजिराव जाधव यांच्या राजवाड्यातील लाईट असो की मग सीसीटीव्ही कॅमेरे स्थानिकांनी आरडाओरड केल्या शिवाय कोणाच्याही लक्षात येत नसे. परंतु आता राजे लखोजीराव जाधव यांच्या समाधीचे शोभीकरण करत असतांना सापडलेल्या यादवकालीन पूर्वाभिमूख शिवलिंगाने स्थानिकांना व परिसरातील नागरिकांना शिवलिंग बघण्याची भुरळ पडली आणि या ऐतिहासिक नगरीचा पुनश्च इतिहास उलगडू लागला आहे. या ऐतिहासिक नगरिमध्ये अनेक गोष्टी बघायला मिळतात आणि उत्खनन करत असताना सापडलेले शिवलिंग हे स्पष्ट करते की तेराव्या शतकात या नगरीमध्ये बांधकाम झालेले असावे आणि त्याचे अवशेष इथेच माती खाली गाडल्या गेले असावे. असे इतिहास अभ्यासकांचे मत आहे. म्हणूनच येथे उत्खनन होणे गरजेचे आहे असा निष्कर्ष इतिहासकारांनी नोंदविला आहे.

# वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्याच्या सौर ऊर्जा प्लेटचे मोठे नुकसान

## नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

हिंगोली जिल्ह्यमध्ये अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने शेतकरी चंद्रकांत व्यंकटी टाले यांच्या गट नंबर ३१६ मधील लावलेल्या स्वरऊर्जा प्लेटचे मोठे नुकसान झाले असून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे सेनगाव तालुक्यातील खुडज येथील अल्पभूधारक शेतकरी चंद्रकांत टाले यांच्या शेतामध्ये शेती उपयोगी असणारे सौर ऊर्जा पंप बसविले असून अचानक झालेल्या वादळी वारा व पावसामुळे सौर ऊर्जा ९प्लेटचे मोठ्या



नुकसान झाले असून सौर ऊर्जा कंपनीने तात्काळ नवीन ९ प्लेटा देण्यात याव्या जेणेकरून सौर ऊर्जा पंपावर शेती अवलंबून होती पण प्लेटचे मोठे नुकसान झाल्याने नवीन प्लेटा बसवून देण्यात याव्या अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली आहे.

# डॉ.रेणू जोशी यांच्या 'अभिनय डान्स स्टुडिओ'चे उद्घाटन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ. संभाजीनगर । ज्ञानेश्वर बुधवत**

येथील अभिनेत्री, अनेक राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय नृत्य स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून काम पाहिलेल्या, राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत नृत्य दिग्दर्शनासाठी चा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त असलेल्या तसेच मागील वर्षी नृत्यामध्ये मानद डॉक्टरेट मिळालेल्या डॉ.रेणू श्रीपाद जोशी यांच्या अभिनय डान्स स्टुडिओ चे नव्या स्वरूपात ,नव्या ठिकाणी स्थलांतरण झाले.

दिनांक २० मे रोजी सायंकाळी सहा वाजता डान्स स्टुडिओ चे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिध्द अभिनेते, नाट्यकलावंत सुनील कांबळे यांच्या हस्ते झाले.या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सुनील कांबळे म्हणाले, डॉ.रेणू जोशी ह्या अनेक वर्षांपासून नृत्य ,कला क्षेत्रात कार्यरत आहे ,यादरम्यान त्यांनी अनेक विद्यार्थांना नृत्याचे अचूक मार्गदर्शन करत स्वतः बरोबरच आपल्या विद्यार्थांना सुद्धा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर घेऊन जाण्यास संधी निर्माण करून दिल्या आहेत. यापुढेही त्या या नव्या स्वरूपातील डान्स स्टुडिओच्या माध्यमातून अनेक कलाकारांना संधी निर्माण करून देतील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या उद्घाटन प्रसंगी अभिनय डान्स स्टुडिओचे माजी विद्यार्थी व पालक आणि अनेक कलाकार मित्रवर्य उपस्थित होते.

# कै.संगीताबाई अरुण शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**



भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील रहिवासी कै. संगीताबाई अरुण शिंदे आज दिनांक १८.०५.२०२४ या रोजी १.३० मिनिटांनी अल्पशा आजाराने निधन झाले त्या अंगणवाडी सेविका होत्या यांचा संक्षिप्त जीवनपट मोठा कष्टाचा होता अंगणवाडी मध्ये काम करत असताना चांगल्या प्रकारे आपली ड्युटी बजावत होत्या, कै. संगीताबाई अरुण शिंदे यांचं मृत्यू समयी वय ४५ वर्षाच्या होत्या त्यांचा अंत्यविधीचा कार्यक्रम सायंकाळी ७.०० वाजता दानापूर येथे झाला. त्यांच्या पश्च्यात पति , २ मुले, सासु, असा मोठा परिवार होत माजी सरपंच अरुण शिंदे यांच्या त्या पत्नी होत्या..

## चारोळी

**मनाचा आरसा**
**नेहमी स्वच्छ असावा**
**किमान स्वतःच्या चेहरा तरी**
**त्यात स्वच्छ दिसावा.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# राजकीय दबावाखाली येऊन महसूल अधिकाऱ्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष ?

## ओव्हरलोड मुरुम, वाळू वाहतूकीची वाहने दररोज रात्री धावतात सुसाट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

ओव्हरलोड मुरुम, वाळू वाहतूकीची वाहने दररोज रात्री धावतात सुसाट मात्र महसूल अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष का करीत आहे? शहरासह ग्रामीण भागातील रस्ते अतीशय गुळगुळीत झाली असून या रस्त्यावर रहदारी नियमित असते. ही रस्ते जास्त काळ मजबूत राहण्यासाठी या मार्गावरील ओव्हरलोड मुरूम, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी महसूल किंवा आरटीओ अधिकाऱ्यांनी स्पेशल मोहीम सुरू करणे गरजेचे बनले आहे अशी प्रतिक्रिया सुजाण नागरिकातून होत आहे. या ओव्हरलोड वाहतुकी बरोबरच अल्पवयीन मुलांचे वाहन चालविण्याचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले असून दर महिन्याला धर्माबाद दौरा करणारे आरटीओ अधिकाऱ्यांचे मात्र याकडे दुर्लक्ष झाले असल्याने भविष्यात दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

सद्या सर्वत्र गुळगुळीत असे नवे रस्ते



झाले आहेत या मार्गावर वाहन चालविण्याचे प्रशिक्षण न घेतलेले अल्पवयीन मुलांचे वाहन चालविण्याचे प्रमाण अधिक झाले आहे. मुळात या प्रकारावर आवर घालून ओव्हर लोड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक महीन्यात दोन वेळा आरटीओ विभागाच्या अधिकाऱ्यांचा दौरा असतो पण त्यात यावर का आवर घातला जात नाही असा प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात आहे.

धर्माबाद पोलिसांच्या वतीने शहरातली वाहतूक सुरळीत करण्यासाठी नियमित लक्ष ठेवले जाते नियमांचे काटेकोरपणे पालन न करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई केली जाते मग आरटीओ विभागाच्या अधिकाऱ्यांना हा प्रकार दिसत नाही का?त्याच बरोबर दररोज रात्री वाळू,मुरूम वाहतुक करणारी ओव्हरलोड टीपर, हायवा देखील सुरू आहेत त्यामुळे आरटीओ अधिकाऱ्यांकडून त्यावर कारवाई साठी मोहीम सुरू करणे गरजेचे बनले आहे. अनेक टिपर ची कागदपत्रे देखील तपासली जावेत आणि नियमबाह्य वाहनांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

# आडगाव राजाचां सिद्धार्थ काळे कोल्हापूरात ठरला सोनेरी पदकाचा मानकरी

## रोलर थर्लेटिक मिनी स्टेट चॅम्पॅनशिप २०२४ स्केटिंग स्पर्धेत प्रथम





लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

कोल्हापुर येथे रोलर थर्लॅटिक मिनी स्टेट चॅम्पॅनशिप २०२४ या स्केटिंग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये स्वराज्य रोलर स्केटिंग कॅडमी उजळाईवाडी व गडमुडशिंगी मधील मुलांनी घवघवीत यश संपादन केले, यामध्ये बिगिनीयर स्केटिंग प्रकारात आडगाव राजा तालुका सिंदखेड राजा येथील सौ . रमा लहू काळे यांचा नातू व सौ. पल्लवी प्रशांत काळे यांचा मुलगा कु . सिद्धार्थ प्रशांत काळे यांनी दोन सुवर्ण पदकासह प्रथम क्रमांक पटकावला तर कु .शिंवाश संतोष चुन्नामुरी रौप्य, कु. हर्षित महेश गुरव कांस्य, स्पीड क्वाड स्केटिंग प्रकारात कु. हर्ष विजय जाधव १ सुवर्ण व स्पीड इनलाइन स्केटिंग प्रकारात कु. स्वरा उमेश दोडमणी २ सुवर्ण अशी उत्तम कामगीरी करण्यात आली,या स्पर्धा २०० व ४०० मीटर मध्ये घेण्यात आल्या या सर्वांना स्वराज्य रोलर स्केटिंग कॅडमी च्या छखखड राष्ट्रीय प्रशिक्षिका सौ.शुभांगी कांबळे मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले तसेच सर्व पालक व कॅडमीचे अध्यक्ष श्री. विजय जाधव सर व सदस्य यांचे सहकार्य लाभले.

संपादकीय

# नाम गुम जाएगा



मतदार याद्यांमधून नावे गायब होण्याच्या तक्रारी आता दर निवडणुकीत नित्याच्या बनल्या आहेत. निवडणूक यंत्रणेकडे स्वतंत्र कर्मचारीवर्ग नसतो; हे मान्य करूनही दोन निवडणुकींच्या मधल्या काळात याद्या सुधारण्याकडे लक्ष देणे, ही अपेक्षा चुकीची म्हणता येणार नाही.

देशात लोकसभेच्या निवडणुकीची घोषणा करताना निवडणूक आयोगाने सादर केलेला तपशील, खंडप्राय देशात मतदान घेण्याबाबत पेललेले आव्हान हे पाहून आपण सारे जण भारावून गेलो. त्यानंतर निवडणूक आयोगाने मतदारांनाही मतदान करण्याबाबत भावनिक आव्हान केले. पुढे देशभरात निवडणूक यंत्रणेनेही मतदार जागृती मोहिमा आयोजित केल्या. ‘मतदान करा, सुट्टी घेऊ नका, पर्यटनाला जाऊ नका,’ असे सारे मतदारांना ऐकविले. मतदान प्रक्रिया सुलभ होण्यासाठी अनेक उपाययोजना हाती घेण्यात आल्या, त्यामध्ये आदर्श मतदान केंद्रे, गृहनिर्माण सोसायटीत मतदान केंद्रे, ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन मतदानाची सुविधा हे ऐकून तर अनेकांना भरून पावले. मतदानाची टक्केवारी वाढावी, म्हणून अनेक स्वयंसेवी संस्था आणि व्यावसायिकांनीही ‘मोफत,’ ‘सवलतीच्या दरात’ वस्तू व सेवा पुरविल्या. त्यामुळे सर्वांचाच उत्साह ओसंडून वाहत होता.प्रत्यक्ष मतदानाचा दिवस उजाडला, तेव्हा मात्र यंत्रणांनी जागृतीमध्ये दाखविलेला उत्साह अन्य कामांमध्ये अभावानेच दिसून आला. वर्षानुवर्षे मतदान करणाऱ्या हजारो नागरिकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांना मतदानाचा हक्क बजावता आला नाही. प्रत्यक्ष यादीत शोध घेतला, आयोगाच्या वेबसाइटवर शोधले, उमेदवारांनी तयार केलेल्या ‘ॲप’मध्येही शोधले, तरीही ही नावे आढळून आली नाहीत. त्यामुळे ही नावे गेली कुठे, हा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. त्यासोबतच जिवंत मतदारांच्या नावापुढे यादीत ‘मयत’ म्हणून उल्लेख येणे, मतदार क्रमांकामध्ये बदल, पत्ते-फोटो चुकीचे, मतदान केंद्रांमध्ये बदल अशा अनेक त्रुटी याद्यांमधून समोर आल्या आहेत. त्यामुळे यादी करताना आणि तिची पडताळणी करताना यंत्रणा उदासीन असल्याचे पुन्हा स्पष्ट झाले.पुण्यातील कोथरूड या एकाच मतदारसंघातून हजारो मतदारांची नावे गायब झाल्याची तक्रार अनेक कार्यकर्त्यांनी केली, हाच प्रकार थोड्याबहुत फरकाने अन्य मतदारसंघातही दिसून आला. प्रारूप मतदार यादी जाहीर होते, तेव्हा मतदारांनी आपले नाव आहे की नाही, हे तपासून पाहिले पाहिजे, हे म्हणणे बरोबरच आहे; परंतु त्याने यादीतून नावे गायब होण्याच्या चुका झाकता येणार नाहीत. वर्षानुवर्षे आपण मतदान करतो, तेव्हा याद्यांमध्ये कायम असलेले नाव गायब होइल, असे कुणाच्या स्वप्नातही येणार नाही. कोणत्याही कारणामुळे यादीतून नाव काढून टाकताना काही प्रक्रिया पार पाडावी लागते. या नावे गायब झालेल्या मतदारांच्या बाबतीत ती प्रक्रिया पार पाडली होती का, हा नागरिकांचा प्रश्नही चुकीचा म्हणता येणार नाही.या प्रकारामुळे आणखी काही यंत्रणांमधील त्रुटीही समोर आल्या आहेत. पूर्वी विविध राजकीय पक्षांचे स्थानिक कार्यकर्ते, हजारी भागांचे पदाधिकारी, बूथ यंत्रणेतील कार्यकर्ते निवडणुकीपूर्वीच नागरिकांच्या घरोघरी जाऊन मतदार यादीतील नाव, मतदार जागेवर आहेत की नाहीत, हे तपासून पाहत. इतकेच नव्हे, तर यादीतील कोणाचे निधन झाले आहे का, कोणी गावाला जाणार आहे का, असा छोटाछोटा तपशीलही त्यांच्याकडे असे. आता थेट मतदानाच्या दिवशीच नावे नसल्याचे समोर येते, याचा अर्थ गेल्या काही काळापासून बहुतांश भागांमध्ये कार्यकर्त्यांकडून ही पडताळणी होत नाही, असाच काढावा लागतो. आता अनेक वर्षे स्थानिक निवडणुका न झाल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह मावळला, की उंटावरून शेळ्या हाकणाऱ्यांचे प्रमाण वाढले, हे सांगता येणार नाही.पुणे लोकसभा मतदारसंघातून यंदा प्रथमच मतदानाने ११ लाखांचा टप्पा ओलांडला. त्यामुळे पुणेकर मतदार जागरूक असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले. सर्वाधिक वेगाने लोकसंख्या वाढणाऱ्या पुणे शहरात मतदारांची संख्या वाढणेही साहजिक आहे, त्यातही स्थलांतरित मतदारांचे प्रमाण मोठे असून, शहराअंतर्गतही नागरिक स्थलांतर करतात. हे सारे बदल वेळीच मतदारयादीत दिसण्यासाठी कार्यक्षम व्यवस्था उभी करण्याची गरज आहे.बरोबर दहा वर्षांपूर्वी, म्हणजे सन २०१४च्या लोकसभेच्या निवडणुकीत अशाच प्रकारे हजारो मतदारांची नावे गायब झाल्याने अनेकांना मनस्ताप झाला. भाजपचे तेव्हाचे उमेदवार आणि नंतरचे खासदार अनिल शिरोळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयापुढे धरणे धरले होते. तेव्हाचे जिल्हाधिकारी सौरभ राव यांनी ‘या चुका पुन्हा दिसणार नाहीत,’ अशी हमी दिली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या दैनंदिन देखरेखीखाली जिल्हा प्रशासनाची सारी यंत्रणा कामाला लागली आणि सहाच महिन्यांत झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत पुण्यातून अपवाद वगळता यादीबाबत तक्रारी आल्या नाहीत. आताही सहा महिन्यांनी विधानसभेची निवडणूक आहे. तोपर्यंत याद्यांमधील चुका दुरुस्त करण्याचे आव्हान जिल्हा प्रशासन स्वीकारणार का, हा पुणेकरांचा प्रश्न आहे.

# विधिसेवा आणि ग्राहकसेवा


सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक महत्त्वाचा निवाडा दिला. त्यानुसार ‘ग्राहक संरक्षण कायदा, १९८६, सुधारित २०१९’च्या तरतुदीनुसार वकिली सेवा ग्राहक कक्षेत येत नाही. या निवाड्यातील महत्त्वाच्या तरतुदी लक्षात घेणे आवश्यक आहे.वकिली सेवा ही ग्राहक संरक्षण कायद्याच्या कक्षेत येत नाही, असा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला. न्यायालयाने त्याची कारणमीमांसा करून, वकिली सेवा ही या कायद्याप्रमाणे ‘सेवा’ या शब्दाच्या परिभाषेत येत नाही, असे जाहीर केले आहे. या निकालातील परिच्छेद क्र. ९८ व ४१९ महत्त्वाचे आहेत. न्यायालयाने नमूद केले आहे, की वकिली व्यवसाय हा अत्याधुनिक शिक्षण पद्धतीवर आधारित आहे. वकील होणाऱ्या व्यक्तीस फक्त कायद्याचे ज्ञान अपेक्षित नसून, त्यासंबंधी कौशल्ये आणि विशिष्ट ज्ञान असणे गरजेचे आहे. त्याशिवाय वकील म्हणून व्यवसाय करता येत नाही. वकिली करण्यासाठीची योग्यता ही केवळ शारीरिक स्वरूपाची नसून, मानसिक स्वरूपाची आहे; त्यामुळे या कायद्यातील ‘सेवा’ या शब्दात अपेक्षित असलेली तरतूद वकिली सेवेस लागू करता येणार नाही.‘सेवा’ या शब्दात अभिप्रेत असलेली व्यक्ती ही व्यवसायिक, व्यापार, सेवा पुरवठा करणारी, त्याचप्रमाणे माल विकणारी आहे. वकिली सेवा यापैकी कुठल्याही सेवेत येत नाही. वकिलाकडे येणारा पक्षकार कायदेशीर बाबींविषयी अनभिज्ञ असतो. त्यासंबंधी वकिलांकडून योग्य ते मार्गदर्शन घेऊन तो न्यायालयातील लढाई करण्यास तयार होतो. त्यामुळे, एखाद्या दुकानात जाऊन वस्तू विकत घेऊन येणे आणि त्या वस्तूमध्ये काही त्रुटी आढळल्यास संबंधितांची तक्रार करणे, अशा स्वरूपाचे काम वकिली सेवेत येत नाही. या वैशिष्ट्यपूर्ण परिस्थितीमध्ये वकील व वकिली सेवा या कायद्याच्या कक्षेत येत नाही. या संबंधी न्यायालयाने असेही नमूद केले आहे की, अशा प्रकारे ‘सेवा’ या शब्दाची परिभाषा वकिली व्यवसायास लागू केल्यास कायद्यामध्ये अंतर्भूत असलेले अर्थ काढता येणार नाहीत. या कायद्याच्या



प्रस्तावनेचे अवलोकन केल्यास दिसून येईल, की रोजच्या व्यापार-व्यवसायातील ग्राहकाची होणारी गैरसोय किंवा दिशाभूल-फसवणूक या बाबीतून ग्राहकाची सुटका करता यावी किंवा त्याला नुकसान भरपाई स्वरूपात दाद मागता यावी, यासाठी तो कायदा आहे; परंतु अशा प्रकारे तो कायदा वकिली सेवेत लागू केल्यास कायद्याचे उद्देश संपुष्टात येतील व त्यास बाधा येईल. या संबंधी सर्वोच्च न्यायालयाने वकील व पक्षकार यांच्या नात्यांसंबंधी खालील महत्वाच्या बाबींकडे लक्ष वेधळे आहे..न्यायालयाने ‘वकील आणि पक्षकार’ यांमधील नाते विस्तृत केले आहे. न्यायालयाने ‘हा व्यवसाय अद्वितीय विशेषता असलेला आहे,’ असे म्हटले आहे. वकील हे त्यांच्या पक्षकराचे प्रतिनिधी असतात. दोघांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण झाल्याने ते ग्राहक संरक्षण कायद्याच्या कक्षेत येईल, असे म्हणता येणार नाही. त्यानुसार वकील व पक्षकार हे पारंपारिक विश्वासाच्या नात्याने बांधलेले असतात. हे विश्वास निर्माण झालेले नाते दोघांनाही मान्य असते. त्यामुळे ते ग्राहक संरक्षण कायद्या लागू होईल, असे म्हणता येणार नाही.याच नात्यातून वकील पक्षकाराला विश्वासात घेतल्याशिवाय कोणतेही निर्णय घेत नाहीत. त्याचप्रमाणे वकिलांशी सल्लामसलत केल्याशिवाय पक्षकाराने कोणतेही निर्णय घेऊ नये, हे अभिप्रेत असल्याने कायद्यातील तांत्रिक तरतुदी लागू करता येणार नाहीत. पक्षकारांना विश्वासात घेतल्याशिवाय वकिलांनी कोणत्याही न्यायालयासमोर पक्षकाराच्या सूचना-संमतीशिवाय कोणतीही हमी देऊ नये, असे अपेक्षित आहे. वकिलाने पक्षकाराने दिलेल्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन काम करू नये, अशीही अपेक्षा आहे.वकिलाने पक्षकाराकडून पक्षकाराकडून अथवा त्याच्या मुखत्यार व्यक्तीकडून योग्य ती माहिती घेतल्याशिवाय कोणतेही प्रकारचे कायदेशीर विधान करू नये, ज्यामुळे पक्षकाराच्या हक्कावर गदा येईल. त्याचप्रमाणे पक्षकाराच्या कायदेशीर हक्काचे संरक्षण करणे, हे वकिलाचे प्रथम कर्तव्य आहे.वकील हे पक्षकाराच्या वतीने न्यायालयात काम करतात. त्यामुळे वकील हे पक्षकार व कोर्ट यांच्यातील एक दुवा असतात. हे कार्य वाटते तेवढे सोपे नाही. वकिलाने पक्षकाराच्या सूचनेनुसार आणि माहितीनुसार कार्य करावे व त्याचे उल्लंघन होणार नाही, याची काळजी घ्यावी. वकिलांनी पक्षकाराच्या हिताची कामे करणे येथे अभिप्रेत आहे.या परिस्थितीमुळे कोर्टाचे असे मत आहे, की वकील कायद्यात नमूद केल्याप्रमाणे ‘सेवा’ देत नसून, ही ‘सेवा’ ही विश्वासाच्या स्वरूपाची आहे. त्यामुळे ग्राहक संरक्षण कायद्याच्या कलम २ (४२) प्रमाणे सेवा मानता येणार नाही; तसेच सेवेत त्रुटी (कमतरता) झाल्या आहेत, असे म्हणता येणार नाही आणि म्हणूनच या कायद्याप्रमाणे कारवाई करता येणार नाही. न्यायालयाने त्यांचे मत संक्षिप्त स्वरूपात खालीलप्रमाणे दिले आहे.ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ व सुधारित कायदा २०१९ प्रमाणे ग्राहकाला अयोग्य, गैरवाजवी, अन्याय्य व अप्रमाणिक परिस्थितींना सामोरे जावे लागू नये अथवा त्यासंबंधी त्याचे संरक्षण होण्यासाठी हा कायदा अस्तित्वात आला आहे; परंतु कायदा निर्माण करणाऱ्यांनी त्यामध्ये व्यावसायिक स्वरूपाची कार्यशैली अंतर्भूत केलेली नाही. त्यामुळे वकील व पक्षकार या कायद्याच्या कक्षेबाहेर आहेत. वकिली व्यवसाय हा अत्युच्च बौद्धिक दर्जाचा व्यवसाय असल्याने त्याला व्यापारी गोष्टींमध्ये होणाऱ्या व त्यासंबंधित बाबींशी जोडता येणार नाही.वकिलाची सेवा वैयक्तिक स्वरूपाची असल्याने ‘अपवादात्मक सेवा’ या श्रेणीमध्ये येते, म्हणून कायद्यात नमूद केलेल्या परिभाषेच्या बाहेर आहे. सर्व परिस्थितीमुळे ‘सेवेत त्रुटी/ कमतरता’ ही बाब लागू करता येणार नाही. या सर्व कारणास्तव सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा पूर्वीचा निर्णय रद्द केला. वकील आणि पक्षकार, डॉक्टर आणि पेशंट यांच्यातील नाते हे विश्वासाचे नाते आहे; परंतु आज त्याला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले आहे. हे विश्वासाचे नाते दोन्ही घटकांनी सांभाळणे गरजेचे आहे, अन्यथा त्याला अनुचित वळण लागू शकेल. ते टाळण्यासाठी अशील आणि वकील दोघांनीही काळजी घेतली पाहिजे.

# करोना लशीची नवी दहशत

जगातील सर्वांत मोठी लसीकरण मोहीम म्हणून गवगवा झालेल्या भारतात, ‘कोव्हिशील्ड’ लशीचे साधारणतः १७५ कोटी डोस देण्यात आले आहेत. या लशीमुळे लाखो भारतीयांचे प्राण वाचले आहेत. त्यामानाने त्याचे जे काही दुष्परिणाम दिसले, ते नगण्य संख्येत होते; त्यामुळे ही लस आपल्या दृष्टीने संजीवनीच म्हणावी लागेल.जागतिक आरोग्य संघटनेने करोनाची साथ संपल्याचे २४ एप्रिल २०२३ रोजी जाहीर केले. या गोष्टीला पुरते एक वर्ष उलटल्यावर, पुन्हा एकदा करोना चर्चेत आला आहे, तोही करोनाच्या लशीच्या विवादाच्या रूपाने. ब्रिटनमधील एका मान्यवर वृत्तपत्राने एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात वृत्त दिले, की न्यायालयीन दस्तावेजानुसार, करोना प्रतिबंधक लशीमुळे ५१ व्यक्तींचा मृत्यू आणि गंभीर दुखापत झाल्याबद्दल, ‘स्ट्राझेनिका’ कंपनीवर १० कोटी पौंडांच्या नुकसान भरपाईचा दावा ब्रिटिश न्यायालयात दाखल केला गेला आहे. त्यानंतर ‘स्ट्राझेनिका’ कंपनीने, कोव्हिड लशीमुळे दुर्मीळ दुष्परिणाम होऊ शकतात, असे मान्य करणारे निवेदन न्यायालयात दिले. या घटनेला एवढी प्रसिद्धी दिली गेली, की भारतातील सर्वसामान्य लोकही चिंतित आणि भयभीत झाले; कारण ‘स्ट्राझेनिका’ची हीच लस, भारतात ‘सीरम इन्स्टिट्यूट’ने ‘कोव्हिशिल्ड’ नावाने बनवली होती. भारतात १२ वर्षांवरील ९५ टक्के व्यक्तींनी करोना लशीचा किमान एक तरी डोस घेतला आहे. त्यातील बहुसंख्यांनी ‘कोव्हिशिल्ड’च घेतल्याने ‘आपल्याला काही होणार तर नाही ना,’ अशी भीती निर्माण झाली. ब्रिटनमधील दाव्यांच्या पावलावर पाऊल ठेवून, भारतातही असे दावे दाखल होऊ लागले. करोना प्रतिबंधक लशीच्या या वादाबाबत विचार करताना, काही मुद्दे लक्षात घेणे जरुरीचे आहे.जानेवारी २०२०मध्ये करोना सुरू झाल्यानंतर, काही दिवसांत १८० देशांमध्ये तो फैलावला. काही काळात, दिवसाला हजारो लोक बाधित झाल्याचे आणि मृत पावल्याचे आकडे जाहीर होऊ लागले, सर्व रुग्णालये पूर्ण भरून गेली. अमेरिकेसारख्या प्रगत देशातही मोकळ्या जागेत कामचलावू उपचार केंद्रे स्थापन झाली. अनेक देशांत विविध प्रकारचे निर्बंध, लॉकडाउन, प्रशासनाची कठोर कारवाई या गोष्टी सुरू झाल्या. या पार्श्वभूमीवर करोना प्रतिबंधक लस लवकरात लवकर आणावी, या दृष्टीने जगातील औषध कंपन्यांत हालचाली सुरू झाल्या. सन



२०२०च्या मे महिन्यात ‘स्ट्राझेनिका’ने, जुलैमध्ये ‘मॉडर्ना’ने आणि ऑगस्टमध्ये ‘फायझर’ने करोनाविरोधी लस बनवण्यात यश आल्याचे जाहीर केले. साथ सुरू झाल्यापासून पाच ते आठ महिन्यांत या लशी तयार झाल्या होत्या. यापूर्वी अशा लशी बनायला पाच ते १० वर्षे लागत असत. प्रगत जैववैद्यकीय तंत्रज्ञान आणि सूक्ष्म जैविकशास्त्रातील संशोधनांमुळे ही गोष्ट काही महिन्यांत साध्य झाली. लस तयार झाल्यावर, त्याच्या चाचण्या तीन टप्प्यांमध्ये केल्या जातात. मानवी चाचणीच्या तिसऱ्या टप्प्यात ती लस घेणाऱ्या व्यक्तींना लागणारा डोस, त्या आजारापासून मिळणाऱ्या मुक्तीची टक्केवारी आणि लशीमुळे उद्भवणारे दुष्परिणाम कसोशीने जोखले जातात. त्यासाठी सर्व वंशाच्या, वयाच्या, आजाराच्या परिस्थितीच्या लाखो स्त्री-पुरुषांना लस देऊन पारखले जाते. करोनाबाबत तिसऱ्या टप्प्यातील स्वयंसेवकांची संख्या मर्यादित होती. या चाचण्या देशोदेशीच्या अधिकृत वैद्यकीय नियामक संस्थांमार्फत होत असल्या, तरीही दुष्परिणाम फारसे नीट तपासले गेले नसावेत, असा अनेक जाणकारांचा आक्षेप होता. त्यामुळेच ‘स्ट्राझेनिका’च्या अशा दुष्परिणामांकडे लोकांचे लक्ष वेधले गेले नाही.सन २०२१मध्ये या लशीचे वितरण जगभरात मोठ्या प्रमाणात झाले; त्याच वेळेस तिच्या दुष्परिणामांची कल्पना अनेक देशांना येऊ लागली. या लशीमुळे रक्ताच्या गुठळ्या होऊन त्या मेंदूमध्ये, हृदयामध्ये जाऊन रुग्ण मृत झाल्याच्या तक्रारी येऊ लागल्या. परिणामी, जर्मनी, युरोपियन युनियनमधील देश, ऑस्ट्रेलिया, साउथ आफ्रिका, कॅनडा, इंडोनेशिया या देशांनी ‘स्ट्राझेनिका’ कंपनीच्या लशीवर बंदी घातली आणि दुसऱ्या कंपनीची लस वापरण्यास सुरुवात केली. कोणत्याही औषधाचे; तसेच लशीचे दुष्परिणाम तीन टप्प्यांत आढळतात.लस घेतल्यावर लगेच किंवा काही तासांनी दुष्परिणाम दिसू लागतात. त्यात चक्कर येणे, ताप येणे, डोके दुखणे, इंजेक्शन दुखणे असे परिणाम होत होते आणि ते लस घेणाऱ्या सर्वांना जाहीरपणे सांगितले जात होते. दुसऱ्या टप्प्यात, लस घेतल्यावर काही तासांनी ते काही आठवड्यांनी होणारे दुष्परिणाम येतात. यामध्ये लस घेतल्यावर रक्तातील प्लेटलेटची संख्या कमी होऊन, रक्ताच्या गुठळ्या बनण्याचा प्रकार, थ्रोम्बोसिस विथ थ्रोम्बोसायटोपेनिया सिंड्रोम किंवा ‘टीटीएस’ या नावाने नोंदवला गेला. हा दुष्परिणाम ‘ॲडिनोव्हायरस’पासून बनवलेल्या लशीबाबत, साधारणतः लस घेतल्यापासून सहा आठवड्यांच्या काळात घडतो, असेही विविध संशोधनांत स्पष्ट झाले. ‘स्ट्राझेनिका’ची ‘व्हॅक्सझेवरिया’; जी भारतात ‘कोव्हिशिल्ड’ नावाने बनवली जात होती, ती ‘बायोइंजिनीअर्ड ॲडिनोव्हायरस’पासून बनवलेली होती. यातून ‘स्ट्राझेनिका’ लशीपासून असे धोकादायक दुष्परिणाम घडत असल्याचे दिसत असले, तरी आता भारतीयांनी त्या लशीचे दोन, तीन किंवा चार डोस घेऊन दीड वर्षांपेक्षाही जास्त काळ उलटला आहे; त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या होण्याची भीती आता बाळगू नये.करोना प्रतिबंधक लस घेतल्यावर दीर्घ काळाने, म्हणजे सहा महिने ते काही वर्षांनी कोणते दुष्परिणाम होऊ शकतात, यावर संशोधन झालेले नाही. ब्रिटनमधील न्यायालयीन दाव्यानंतर कदाचित यापुढे असे संशोधन होईलही. मात्र, ‘कोव्हिशील्ड’ घेतलेल्या सर्वसामान्य नागरिकांनी, आजमितीला तरी यापुढे गंभीर त्रास होण्याच्या विचारांनी घाबरायचे काही कारण नाही.जगातील सर्वांत मोठी लसीकरण मोहीम म्हणून गवगवा झालेल्या भारतात, ‘कोव्हिशील्ड’ लशीचे साधारणतः १७५ कोटी डोस देण्यात आले आहेत. या लशीमुळे लाखो भारतीयांचे प्राण वाचले आहेत. त्यामानाने त्याचे जे काही दुष्परिणाम दिसले, ते नगण्य संख्येत होते; त्यामुळे ही लस आपल्या दृष्टीने संजीवनीच म्हणावी लागेल.अर्थात प्रत्येक व्यक्तीचे जीवन अनमोल असते; त्यामुळे ज्यांना या लशीचे दुष्परिणाम भोगावे लागले, त्यांना न्याय मिळालाच हवा. ‘स्ट्राझेनिका’च्या लशीच्या वृत्ताचा ज्या प्रमाणात प्रसार झाला, त्याचा परिणाम पुढे अशीच मोठी साथ आलीच, तर त्या वेळच्या लशीकरणावर होऊ शकेल. एवढेच नव्हे, तर औषध कंपन्याही नवी लस निर्माण करायला कदाचित धजणार नाहीत.

# आनंद या आध्यात्मिक चळवळीचे संस्थापक

वयाच्या २२व्या वर्षी वॉल्टर्स योगानंदांना भेटले, त्यांचे शिष्य बनले. नंतर १९५२मध्ये गुरू योगानंदाचे निधन झाल्यानंतर त्यांनी सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप- एसआरएफ आश्रमात सेवा सुरू ठेवली. सन १९५५मध्ये वॉल्टर्स यांना संन्यासाची शपथ देण्यात आली आणि सरोलानंद, बिमलानंद आणि भक्तानंद यांच्यासह दया माता, तत्कालीन एसआरएफ अध्यक्षांनी एसआरएफ ऑर्डरचा भाऊ म्हणून नियुक्त केले आणि त्यांना क्रियानंद हे नाव देण्यात आले. सन १९६०मध्ये एम.डब्ल्यू.लुईसचे निधन झाल्यावर एसआरएफ संचालक मंडळाने क्रियानंद यांची संचालक मंडळावर आणि अखेरीस उपाध्यक्षपदी निवड केली. सन १९६२मध्ये संचालक मंडळाने त्यांना एसआरएफमधून काढून टाकण्यासाठी एकमताने मतदान केले आणि त्यांच्या राजीनाम्याची विनंती केली. क्रियानंद यांनी योगानंदांच्या जागतिक बंधुता वसाहतींच्या आदर्शावर आधारित आनंद या धार्मिक आणि सांप्रदायिक संघटनांची जागतिक चळवळ स्थापन केली.

क्रियानंद- जे डोनाल्ड वॉल्टर्स यांचा जन्म दि.१९ मे १९२६ रोजी टेलीजेन, रोमानिया येथे अमेरिकन पालक रे.पी. आणि गर्ट्रूड जी वॉल्टर्स यांच्या घरी झाला. त्यांचे वडील एस्सो कॉर्पोरेशनमध्ये तेल भूगर्भशास्त्रज्ञ होते, ज्यांना नंतर रोमानियन तेलक्षेत्रात नियुक्त केले गेले. रोमानिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड आणि युनायटेड स्टेट्समध्ये त्यांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण घेतले. त्याने हेव्हरफोर्ड कॉलेज आणि ब्राउन युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेतले, नंतर त्यांच्या वरिष्ठ वर्षात सोडले. त्यानंतर स्टेजक्राफ्टचा अभ्यास करण्यासाठी ते दक्षिण कॅरोलिनाला गेले. तेथे गेल्यानंतर वॉल्टर्सने भगवद्गीता वाचली आणि नंतर योगानंद यांचे योगींचे आत्मचरित्र वाचले. वॉल्टर्सच्या म्हणण्यानुसार त्यांना न्यूयॉर्क शहरातील पुस्तकांच्या दुकानात आत्मचरित्र सापडले आणि त्यामुळे त्यांचे जीवन बदलले. ते शाकाहारी बनले आणि सन १९४८मध्ये योगानंदांच्या शिष्यांपैकी एक बनण्यासाठी त्यांनी दक्षिण कॅलिफोर्नियाला बसने क्रॉस-कंट्री प्रवास केला. ते लॉस एंजेलिस, कॅलिफोर्निया येथे आल्यावर, वॉल्टर्स योगानंदांना भेटले आणि वॉल्टर्सच्या आत्मचरित्रानुसार शिष्यत्व आणि त्यागाची शपथ घेतली. वॉल्टर्सने लवकरच योगानंदांच्या सेल्फ-रिलायझेशन फेलोशिप संस्थेमध्ये नेतृत्वाचे स्थान प्राप्त केले आणि व्याख्याता म्हणून काम केले. दि.७ मार्च १९५२ रोजी परमहंस योगानंद हे अमेरिकेतील अभ्यागत भारतीय राजदूत बिनय रंजन सेन आणि त्यांच्या पत्नीसाठी लॉस एंजेलिसच्या डाउनटाउनमधील बिल्टमोर हॉटेलमध्ये आयोजित मेजवानीत वक्ते होते. भाषण देत असताना योगानंद अचानक जमिनीवर कोसळले आणि त्यांचा मृत्यू झाला, तेव्हा वॉल्टर्स सभागृहात उपस्थित होते. सन १९५३मध्ये एसआरएफने वॉल्टरचे स्टोरीज ऑफ मुकुंदा हे पुस्तक प्रकाशित केले. तद्नंतर वॉल्टर्स एसआरएफच्या हॉलीवूड केंद्रात मुख्य मंत्री बनले. यावेळी त्यांनी संन्यास आणि क्रियानंद हे मठ नावाचे पुढील व्रत घेतले. एसआरएफच्या नियतकालिकानुसार सन १९५५पासून २०१०पर्यंत एसआरएफच्या अध्यक्षा दया माता यांनी शंकराचार्यांच्या स्वामी आदेशात त्यांना संन्यासाची अंतिम शपथ दिली होती. या आदेशाबाबत योगानंद यांनी त्यांच्या आत्मचरित्रात म्हटले आहे- प्रत्येक स्वामी हा प्राचीन मठातील आहे, जो शंकराने सध्याच्या स्वरूपात आयोजित केला होता.

# ऑनलाइन खरेदी वाढल्याने फसवणुकीची शक्यता

## ऑनलाइन पार्सल उघडताय; व्हिडीओ रेकॉर्डिंग नक्की करा; ग्राहकांनो सतर्क व्हा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**



आता ऑनलाइन साहित्य खरेदी करताना सावधानता बाळगा, नाही तर आपल्याला गंडा बसू शकतो? ऑनलाइन वस्तू मागविताना व्हिडीओ रेकॉर्डिंग करूनच ऑनलाइन पार्सल उघडावे. मोबाइलमध्ये असलेले विविध अँप्स ऑनलाइन खरेदीचे दालन ग्राहकांपुढे उभे करीत आहेत; मात्र अशी खरेदी करताना ग्राहक म्हणून आपण अधिक सजग राहणे गरजेचे आहे. त्यामुळे मागविण्यात आलेले पार्सल उघडताना त्याचा व्हिडीओ करणे गरजेचे आहे. जेणेकरून पार्सल उघडताना त्यात असलेल्या वस्तू डॅमेज असतील तर ते व्हिडीओमध्ये रेकॉर्ड होईल. ऑनलाइन शॉपिंगचा मोह आता सर्वांनाच जडला आहे. परिणामी, ऑनलाइन फसवणुकीच्या घटनाही वाढू लागल्या आहेत. अशात पार्सल उघडताना त्याचा व्हिडीओ तयार करणे विसरू नका. ऑनलाइन शॉपिंगच्या माध्यमातून साहित्य मागविण्याचा मोह आता सर्वांनाच जडला आहे. सुरक्षित आणि सजग राहून शॉपिंग केल्यास ऑनलाइन खरेदीचे फायदे जास्त असल्याचा अनुभव अनेक जण सांगतात. दुकानांमध्ये, मॉलमध्ये, होलसेल मार्केटमध्ये जाऊन एखादी वस्तू खरेदी करताना ग्राहक दहा वेळा विचार करून पारखून खरेदी करतात. परंतु ऑनलाइन खरेदी करताना ग्राहकांची फसवणूक होते. आतापर्यंत घटना घडल्या असल्या तरी त्या पुढे आल्या नाहीत.ऑनलाइन पार्सल मागविताना शक्यतो कॅश ऑन डिलिव्हरीचा पर्याय निवडावा. त्यामुळे खरेदी करताना काही चूक झाल्यास आपण दिलेल्या रकमेचा घोळ होत नाही. ज्या कंपनीची वस्तू आपण खरेदी करणार आहात त्या कंपनीची ऑनलाइन खरेदीसंदर्भातील माहिती तपासून घ्यावी. त्यामुळे होणारी संभाव्य फसवणूक टाळली जाऊ शकते.सध्या विविध वेबसाईट ऑनलाइन विक्रीच्या क्षेत्रात उतरल्या आहेत. या वेबसाइट ई- कॉमर्सच्या नियमानुसार सुरू झाल्या आहेत. ऑर्डर केलेलेच साहित्य आले किवा नाही, हे आधी तपासून पाहणे आवश्यक आहे.

### आमिशाला बलि पडू नका

ऑनलाइन खरेदी करताना आपण कोणत्या वेबसाइटवरून खरेदी करीत आहेत, याबाबत सतर्कता बाळगा. ऑनलाइन खरेदी करताना काही समस्या आल्यास त्यांच्या निवारणासाठी काही यंत्रणा आहे का, याची खात्री तसेच अनेकाना कॉल येतो लिंक येते की आपले लोन मंजूर आहे तुम्ही काही पैसे पाठवा तुमच्या खात्यात आम्ही पैसे जमा करतो विविध वेब साईट वरुन मेसेज लिंक येते त्या वर किलिक करू नये त्याची चौकशी पूर्ण पने करणे अत्यावश्यक आहे.विना खात्रीने ऑनलाइन खरेदी केल्यास त्याचा फटका ग्राहकांना बसतो. विविध रैकेट या संदर्भात आपल्याला फसवणूक करण्या साठि नको ते पर्याय शोधुन आपल्याला फ़सवतात अपन सतर्कता बालगयल हवि व याची तक्रार जवळच्या पोलिस ठाण्यात करावी.

**बालाजी वैद्य**
**पोलिस निरीक्षक भोकरदन**

# 'पैसा फेको, तमाशा देखो' ही एकनाथ शिंदेंच्या कामाची पद्धत-संजय राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**



'पैसा फेको, तमाशा देखो' ही एकनाथ शिंदेंच्या कामाची पद्धत होती. जी भाजपच्या राज्यातील सर्व वरीष्ठांना मान्य नव्हती. त्यामुळे २०१९ मध्ये शिवसेनेच्या वतीने त्यांची विधिमंडळ प्रमुख पदी निवड झाल्यानंतर राज्यातील सर्व भाजपच्या नेत्यांनी त्यांच्या नेतृत्त्वाला विरोध केला होता. असा दावा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. महाविकास आघाडी स्थापन होण्याआधीच मुख्यमंत्री पदाबाबत भाजपसोबत आमची बोलणी सुरू होती. मात्र, दिल्लीतून कोणताही निर्णय आला तरी आम्हाला एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व मान्य नसल्याचे देवेंद्र फडणवीस आणि आजच्या मंत्रिमंडळातील वरीष्ठ नेत्यांनी आम्हाला निरोप पाठवला होता. असा दावा देखील संजय राऊत यांनी केला आहे.शिंदे यांना कामाचा कोणताही अनुभव नाही. त्यांच्याकडे तेवढी प्रग्लभता नाही. त्यामुळे त्यांचे नेतृत्व नको अशी भूमिका ही भारतीय जनता पक्षाची होती. त्यानंतर आम्ही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोबत गेलो होतो. त्या वेळी देखील एकनाथ शिंदे मुख्यमंत्री पदी नकोत आम्ही त्यांच्या हाताखाली काम करणार नाही, हे सर्वात आधी सुनील तटकरे, अजित पवार आणि दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले होते. एकनाथ शिंदे यांच्यापेक्षा आम्ही सिनीअर आहोत, ज्युनियर माणसाच्या हाताखाली आम्ही काम करणार नाही, ही त्यांची भूमिका होती, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे.शरद पवार असो किंवा राहुल गांधी असो या दोघांचाही या सरकारचे नेतृत्व एक अशा चेहऱ्याने करावा की महाविकास आघाडीतील प्रत्येक घटकाला ते मान्य व्हावे, अशी भूमिका होती. मात्र, त्या वेळी अजित पवार, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वात काम करण्यास नकार दिला होता. अशी माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली.प्रफुल्ल पटेल यांना सुरुवातीपासूनच भारतीय जनता पक्षासोबत जायचे होते. शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांच्या विषयी सत्य सांगितले असल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. शरद पवार यांनी प्रफुल्ल पटेल यांच्या बद्दल कोणताही गौप्यस्फोट केलेला नाही. मिडीयाला तसे का वाटते? याचे मला आश्चर्य आहे. तो कोणताही गौप्यस्फोट नसून हे उघड सत्य आहे. प्रफुल्ल पटेल यांना भाजपसोबत जाण्याची इच्छा होती, हे आधीपासूच सर्वांना माहिती होते, असेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी घेतलेली भूमिका याचे मी स्वागत करतो. अरविंद केजरीवाल भारतीय जनता पक्षाच्या मुख्यालयात सर्व नेते आणि खासदार, आमदारांसोबत जात आहे. केंद्रातील सरकार बदलत आहे. तरी देखील केंद्र सरकारची मस्ती जिरलेले नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे केजरीवाल यांनी घेतलेला आंदोलनाचा पवित्र हा खूप चांगला असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.देवेंद्र फडणवीस यांना हिमालयात बसायचेच आहे. किंवा केदारनाथला जाऊन पूजा अर्चा करत घंटा बडवत बसाचेच आहे. त्यांचे सरकार आता जात आहे. त्यामुळे त्यांनी पूजा अर्चा करत बसावे. राज्य आम्ही करणार आहोत, असे देखील संजय राऊत यांनी म्हटले आहे. ते लव्ह जिहाद करत असतील तर आम्ही यज्ञ करू, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेवर निशाणा साधला होता. त्याला संजय राऊत यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

# मुलाचा वाढदिवस अनाथ आश्रमातील वृद्धांना गोड जेवण देऊन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोळे । प्रतिनिधी**

कोळे येथील तलाठी योगेश बोदमवाड भाऊसाहेब यांनी आपल्या मुलाचा ४था वाढदिवसानिमित्त सांगली येथील सावली बेघर निवारा केंद्र आनाथ आश्रम येथील वृद्ध, अपंग बेघर असणाऱ्या लोकांसोबत आपल्या मुलाच्या ४ था वाढदिवस साजरा केला.या वृद्धांना गोड जेवणाचा आस्वाद दिला.भाऊसाहेब म्हणाला की, मोठं मोठे केक कापून वाढदिवसाचे प्रदर्शन करण्यापेक्षा प्रत्येकाने जन्मदिनी या अनाथ वृद्धांना सुखाचा घास दिल्यास ईश्वराचे आशिर्वाद मिळतील.आपण या समाजाचे काहीतरी देणं लागतो वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून अनाथ वृद्धांची सेवा करण्याची इच्छा असल्यामुळे व आपले कर्तव्य आहे या समाजासाठी काहीतरी करणं व आपल्या आनंदात अनाथ मुलांना ,व वृद्धांना सामावुन घेणं व त्यांची मदतरुपी सेवा करुन त्याचं दुःख कमी करणं म्हणुन अनाथ मुलांसोबत वाढदिवस साजरा करत आहे.आश्रमाचे अध्यक्ष मुस्तफा मुजावर , रफिक मुजावर, बाबू नायर,इन्साफ ट्रस्ट च्या माध्यमातून मागील दहा वर्षांपासून अनाथांचा सांभाळ करताना काही मोजकेच तरुण इथे येऊन भोजनसेवा देत असतात. कारण हा आश्रम तुमचा माझा सर्वांचा आहे, येथील बेघर असणाऱ्या चे संगोपन करून त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याचे काम कोणीतरी येऊन करत असतो.या वेळी भाऊसाहेब चे मित्र कोळे ग्रॅम पंचायत सदस्य बिरा शेठ आलदर ,करडवाडी पोलीस पाटील मदन आलदर ,युवा नेते अमोल मोहिते,उत्तम आलदर पंच,नारायण आलदर ,सोबत शिक्षक साईनाथ नाईनवाड ,शिवाजी करांडे सर, व्हनमाणे समाधान हे उपस्थित होते.



# कारवाई न करण्यासाठी पोलिस उपनिरीक्षका कडून तीन लाखांच्या लाचेची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**




मीटर चोरी गुन्हा दाखल असलेल्या आरोपीवर पोलिस कारवाई न करण्यासाठी तीन लाखांची लाचेची मागणी करणाऱ्या चंदननगर पोलीस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षकाविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) भ्रष्टाचार कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक तानाजी सर्जेराव शेगर याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आरोपी विरोधात तक्रार दिली आहे. तक्रारदार महावितरणमध्ये कामाला आहेत. त्यांच्याविरुद्ध चंदननगर पोलीस ठाण्यात मीटर चोरीचा गुन्हा दाखल असल्याचे उपनिरीक्षक शेगर याने सांगितले होते. या गुन्ह्यात तपास करण्यात येत असून कारवाई न करण्यासाठी शेगरने तक्रारदाराकडे पाच लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने तडजोडीत तीन लाख रुपये देण्याचे मान्य करुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. शहानिशा केल्यानंतर शेगरने तक्रारदाराकडे लाच मागितल्याचे उघड झाले. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक रुपेश जाधव पुढील तपास करत आहेत.

# संजय राऊत यांनाच मुख्यमंत्री व्हायचे होते:आमदार नितेश राणे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

संजय राऊत यांनाच मुख्यमंत्री होण्याची इच्छा होती. त्यामुळे त्यांनीच उद्धव ठाकरे यांच्या नावाला विरोध केला होता, असा पलटवार भारतीय जनता पक्षाचे आमदार नितेश राणे यांनी केला आहे. मुख्यमंत्री पदी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात काम करण्यास देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह त्याच्याच मंत्रिमंडळातील नेत्यांनी विरोध केला होता, असा दावा खासदार संजय राऊत यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपाला आमदार नितेश राणे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. इतकेच नाही तर संजय राऊत हे उद्धव ठाकरे यांना ब्लॅकमेल करत होते, असा आरोपही आमदार राणे यांनी केला आहे.

संजय राऊत यांनी शरद पवार यांच्याकडे स्वतःला मुख्यमंत्री करण्यासाठी आग्रह धरला होता. इतकेच नाहीतर सामनाच्या कार्यालयातून देखील सर्व आमदारांना फोन करून संजय राऊत यांचे नाव घेण्यासाठी सांगण्यात आले होते. असा आरोप नितेश राणे यांनी केला आहे. संजय राऊत हे उद्धव ठाकरे यांना ब्लॅकमेल करत होते, असा आरोप देखील नितेश राणे यांनी केला आहे. मला मुख्यमंत्री केले नाही तर मातोश्री मधील अनेक महत्त्वाची



माहिती मी बाहेर सांगेल, अशी धमकी संजय राऊत यांनी दिली होती, असा आरोपही आमदार राणे यांनी केला आहे.२०१९ च्या निवडणुकीनंतर भारतीय जनता पक्षाचे नेते मुख्यमंत्रीपदासाठी एकनाथ शिंदे यांना विरोध करत होते. त्यांच्या नेतृत्वात आपण काम करणार नसल्याचा निरोप भारतीय जनता पक्षाच्या राज्यातील नेत्यांनी मातोश्रीवर पाठवला होता. त्या नंतरच्या काळात महाविकास आघाडीची स्थापना झाली त्यावेळी देखील एकनाथ शिंदे यांचे नाव मुख्यमंत्री पदासाठी समोर आल्यानंतर अजित पवार, दिलीप वळसे पाटील आणि सुनील तटकरे यांनी त्याला विरोध केला. असा दावा संजय राऊत यांनी केला आहे. संजय राऊत यांच्या या दाव्याला आता आमदार नितेश राणे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

## आडद येथे सामूहिक विवाह सोहळा

# सामाजिक वर-वधूंना संसार उपयोगी साहित्यासह आर्थिक मदत : चार जोडपी विवाह बंधनात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम रजा**

अडद गेल्या अनेक दिवसांपासून लग्नसमारंभ जोरात सुरू आहेत,सर्वत्र लग्नाची धामधूम बघायला मिळत आहे,शहरी भागात शाही लग्न सोहळे वेळेवर पार न पडता. त्यात मानापमानाचे नाटय पहायला मिळते कर्जबाजारी होऊन अथवा जागा जमिनी विकून कित्येकांनी मुलामुलींचे हात पिवळे केले. वर आणि वधू पित्याची धांदल, धावपळ अनेकांनी अनुभवली. मात्र यापेक्षाही सरस विवाह सोहळे सामुदायिक विवाह सोहळ्यात संपन्न होत असल्याचे दिसून येत आहे. उमरखेड तालुक्यातील अतिशय डोंगर दऱ्यात वसलेल्या आडद गावात अशाच पद्धतीने सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला, गेल्या अनेक वर्षांपासून आडद या गावात सामुहिक विवाह संपन्न होत असतात,दि.१८-५- शनिवारला चार नवदांपत्य एकाच वेळी विवाह बंधनात अडकले या चारही जोडप्यांना नांदेड महानगर



पालिकेचे माजी महापौर किशोर भवरे यांनी संसार उपयोगी साहित्य भेट देऊन आर्थिक मदत देखील केली,डोंगर दऱ्यात असलेल्या आडद सारख्या छोट्याश्या गावचा आदर्श इतर गावांनी घेऊन भविष्यात सामूहिक विवाह करण्याचे आवाहन देखील भवरे यांनी उपस्थित नागरिकांना केले, या सामुहिक विवाह सोहळ्यात यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती तातूभाऊ देशमुख, जीवन ठेंगे,सामाजिक कार्यकर्ते आंबदास धुळे,चरण डोंगरे, माजी सरपंच धनज माजी पंचायत समिती सदस्य मनीषा कऱ्हाळे,खविस संचालक विजय हनवते,धनज येथील सरपंच देवानंद पाचपुते,पिंपळदरीचे सरपंच बंडू ढाकरे,कृ,उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मंचक चव्हाण,सुरेश तांबारे,मारोती कऱ्हाळे,यांनी उपस्थित राहून वधू वरांना आशीर्वाद दिले.

### ठरलेल्या वेळेतच होतात विवाह

बँड,डीजे मुळे अनेक ठिकाणी लग्नाला खुप उशिर होतो,वेळेचे कोणत्याही प्रकारचे भान न ठेवता तरुण मंडळी नाचण्यात दंग असते,पण याला अपवाद ठरते ते म्हणजे आडद गाव,माणसाच्या जीवनात वेळेला किती महत्व आहे.हे शिकावं ते आडद येथील नागरिकांकडून, या गावात गेल्या अनेक वर्षांपासून विवाह सोहळा हा ठरलेल्या वेळेतच संपन्न केल्या जातो,ठरलेल्या वेळेत पाहुण्यांची सुद्धा वाट बघितल्या जात नाही,लग्नपत्रिकेवर असलेल्या वेळेतच येथील विवाह लावले जातात हे मात्र विशेष.

दैनिक लोकनेता



# बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका मान्सुनपुर्व साफसफाईची जिल्हाधिकाऱ्यांना मागणी-डॉ.ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**





मान्सून कालावधीत पुर अथवा वादळांमुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची दाट शक्यता असते या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून आधिका-यांच्या बैठका घेण्याचा सपाटा लावत संबंधित कार्यालयात २४ तास नियंत्रण कक्ष सुरू करते मात्र बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील फ्लड झोन (पुर नियंत्रण रेषा) मध्ये सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकाम आणि नदीपात्रातील उगवलेल्या बाभळीमुळे नदीपात्रात अरूंद झाले असुन झाडांना पाणी आडुन शहरात शिरण्याची दाट शक्यता असुन बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका असुन त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे त्यामुळे एकंदरीत आपत्ती व्यवस्थापनाच्या बैठका नेहमीप्रमाणेच वांझोट्या ठरणार आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणात तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे , शिवशर्मा शेलार , रामनाथ खोड यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना केली आहे.बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुर नियंत्रण क्षेत्रातील भुमाफियांकडुन करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामाकडे नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असुन बीड शहरातील नदी नाले,ओढे यांच्यावर राजकीय पुढारी, कार्यकर्ते, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, नगररचनाकार,भुमिअभिलेख, जलसंपदा विभाग कार्यालय यांनी संगनमतानेच भुमाफियांशी आर्थिक लाभातुन हातमिळवणी केली आहे.बीड शहरातील नदी,नाले,ओढे यांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे.सव्हेक्षण नसल्याने रेडफ्लर्ड लाईन व ब्लूलाईन हा पट्टा ठरविण्यात आला नसल्याने नगरपरिषद प्रशासन याचा गैरफायदा घेत असुन अतिक्रमित बांधकाम प्रकरणी कंत्राटदार व जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. महापुर येण्यास पुरक्षेत्रातील अतिक्रमणे, अवैध बांधकाम कारणीभूत असुन त्यामुळे पुरबाधित क्षेत्र असलेल्या ब्लु आणि रेड झोनमध्ये बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये असे मुख्यमंत्री यांचे स्पष्ट आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. १९८९ साली अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक व जिवितहानी झाली होती आणि २०१४ आणि २०२१ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात पुर सदृश स्थिती निर्माण झाली होती. मोठ्या प्रमाणात नागरीकांना याचा फटका बसला होता.शहरातील विविध भागांमध्ये पाणी शिरल्याने शहरवासीयांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले होते. बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा-या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही उपाययोजना करण्यात येत नाही.यापुर्वीही अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी.बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत.त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ झाले आहे.या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे.शहरातील आसपासच्या भागातील कचरा,घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच-यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

## तपोवन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

# या नवीन हॉस्पिटलचा आ.सुरेश अण्णा धस यांच्या हस्ते उदघाटन समारंभ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी तालुक्यातील डॉ.शरद नामदेव मोहरकर व सौ. रुपाली मोहरकर(बांगर) यांनी अहमदनगर शहरात तपोवन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल या नवीन हॉस्पिटलचा आ.सुरेश अण्णा धस यांच्या हस्ते उपस्थित मान्यवर व कुटुंबातील जेष्ठ आई वडिलांच्या हस्ते फीत कापुन उदघाटन समारंभ संपन्न झाला.


यावेळी तालुक्यातील व नगर शहरतील डॉक्टर मंडळी नातेवाईक उपस्थित होते, डॉ.मोहरकर यांनी कोरोना काळात मोठ्या प्रमाणात रुग्णांना सेवा दिली,यामुळे अनेक गंभीर व तातडी असणाऱ्या रुग्णांना त्यांच्या आष्टी येथील कोव्हीड सेंटरमध्ये योग्य उपचार केल्याने अनेक रुग्णांना जीवदान मिळाले आहे,आज या नवीन व मोठ्या स्वरूपात सुरू केलेल्या हॉस्पिटलमध्ये १० आय.सी.यु. बेड,२५ जनरल बेड,ऑपरेशन थेटर,यासह सर्व सुविधांयुक्त उपचार व तज्ञ डॉक्टर उपलब्ध असणार आहेत,त्यामुळे डॉक्टर असलेल्या मोहरकर कुटुंबाने यापुढेही अशीच रुग्णसेवा देऊन गोरगरीब व गरजूंना सहकार्य करावे अशा शुभेच्छा दिल्या आहेत.

## डॉ.सय्यद हुमायुद्दिन अल्लाउद्दीन यांच्यातर्फे

# नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब मुलांना कुलर ची मदत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**




आष्टी तालुक्यात नवजीवन फाउंडेशन संचलित नवजीवन संगोपन केंद्र येथे अनाथ, निराधार,ऊसतोड मजूर, वीटभट्टी कामगार,आदिवासी, भटके विमुक्त,गरीब, वंचित, दुर्लक्षित घटकातील मुलांचा मोफत सांभाळ करून शिक्षण दिले जाते.या नवजीवन संगोपन केंद्रास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा मदत मिळत नाही सदरील केंद्र समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून आणि मदतीतून चालवले जात आहे.या अनाथ, निराधार मुलांना उन्हाची तीव्रता जास्त असल्यामुळे एक कुलर ची खूप गरज होती.म्हणून फुल ना फुलाची पाकळी मदत व्हावी. तसेच आपणही समाजाचे काही देणे तरी लागतो या उदात्त भावनेने आष्टी येथील सुप्रसिध्द दंतरोग तज्ञ आणि नेहमीच सामजिक कार्यास हात देऊन सहकार्य करणारे डॉक्टर सय्यद हुमयुद्दिन यांनी उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि वातावरणात खूप गर्मी असल्यामुळे नवजीवन संगोपन केंद्र येथील गोरगरीब,अनाथ निराधार मुलांना एक कुलर देऊन सामाजिक बांधिलकी जपत या मुलांची उन्हापासून सुरक्षा व्हावी या उदात्त भावनेने मदत केली.डॉ.सय्यद हुमायुद्दीन हे सुप्रसिध्द कवी प्रा. अल्लाउद्दीन सरांचे पुत्र आहेत सरांनी आपल्या मार्गदर्शनाने अनेक विद्यार्थी घडवले.तसेच आपल्याही मुलांना योग्य मार्गदर्शन करून,शिक्षण देऊन डॉक्टर बनवले.आपल्या वडीलांप्रमाने डॉ.हुमायुद्दीन हे सुद्धा नेहमीच सामजिक कार्यास हातभार लावून सहकार्य करतात नुकतेच त्यांनी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून आष्टी येथे दंतरोग तज्ञ म्हणून आपल्या व्यवसायाला सुरुवात केली आहे त्यांच्या हातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडो त्यांच्या या कार्यास नवजीवन संगोपन केंद्र आष्टी येथील अनाथ निराधार मुलांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा दिल्या व कार्यक्रमाच्या शेवटी नवजीवन संगोपन केंद्र संस्थापक अध्यक्ष विकास म्हस्के मेजर यांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

# बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करुन झाले आठ महिने,परंतु जनतेला शासनाने वाऱ्यावर सोडल- भाई विष्णुपंत घोलप

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



सन-२०२४ च्या खरीप हंगामात पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके वाया गेली. सोयाबीन, तुर, मका, कापुस, मुग, उडीद, कांदा आणि इतर सर्वच पिके जवळपास ८०% उत्पादन कमी झाले आहे. त्या नंतर शासनाने बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला व या नंतरच्या काळात सर्वच खरीप पिकाचा किमान ७५% पिक विमा शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असतांना उचल म्हणून २५% अग्रीम विमा बीड जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना मिळाला. शेतकऱ्यांचे लाईटबील संपूर्ण माफ करणे गरजेचे असतांना जिथे विद्युत पंपच चालले नाहीत तिथे शेतकरी लाईट बील कसे भरणार, बँकेकडुन शेतकऱ्याने काढलेले खरीप पिक कर्ज हे पुर्णतः माफ करणे गरजेचे आहे, किमान पिक कर्जाचे पुनगर्ठन करुन नव्याने पिक कर्ज देणे, नवीन खरीप पिकासाठी गरजेचे आहे. जिल्ह्यात दुष्काळामुळे आज बेरोजगारी जास्त वाढत चालली आहे, त्या कष्टकरी मजुरांना प्रत्येक गावच्या शिवारात किमान १०० मजुरांना रोहयोचे काम मिळेल असे कोणते ही नियोजन जिल्हा प्रशासनाने केलेले नाही. आज काही ठिकाणी जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असतांना चारा छावण्या नाही तर किमान शेतकऱ्याला गाय, बैल, म्हैस, शेळी, मेंढी यांना जगवण्यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे. जनतेला पिण्यायोग्य स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे तो त्यांचा अधिकार आहे. परंतु या वरील कोणत्याही विषयावर शासन गांभीर्याने घेत नाही. शासनाने दुष्काळ जाहीर करुन ८ महिने झाले तरी त्याची अंमलबजावणी केलीच नसल्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील जनता मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहे. याची तात्काळ दखल शासनाने घ्यावी नसता जनतेला बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्षा तर्फे तिव्र आंदोलन करण्यात येईल असे लेखी निवेदन भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांच्या मार्फत राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड मा.ना.धनंजयजी मुंडे साहेब यांना पाठविले आहे. व माहितीस्तव मा. जिल्हाधिकारी, बीड तसेच भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांनी दिले आहे.

# उद्धव ठाकरे चिडलेले अन् घाबरलेले, त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली ;त्यांनी राज्यासह मुंबई मनपा लुटली-चंद्रशेखर बावनकुळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक (वृत्तसंस्था)**

उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना अनेक आजार झाले असून, ते चिडलेले आणि घाबरलेले आहेत. सध्या त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे, त्यामुळे ते काहीही बडबड करीत आहेत, अशी टीका भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नाशिकमध्ये बोलताना केली आहे.

दरम्यान चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, ठाकरे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मुंबई महापालिकेची लूट केली असून, चोरांचे सरदार कोण आहेत, ते राज्याने पाहिले आहेत, असा टोलाही त्यांनी ठाकरेंना लगावला आहे.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे राज्याचा विकास करीत आहेत. दुसरीकडे ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी मुंबई लुटली, असा आरोप बावनकुळे यांनी केला. तर राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे काही मागण्या केल्या आहेत. ठाकरे यांच्या मागण्या पंतप्रधान मोदी नक्कीच पूर्ण करतील, असा दावाही त्यांनी केला. शरद पवारांना बारामतीत गल्लोगल्ली फिरावे लागले. त्यामुळे ते बारामतीत हरत असल्याचा दावाही बावनकुळे यांनी केला.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यासह मुंबई मनपा लुटण्याचा प्रकार ठाकरे यांनी केल्याचे सगळ्यांना ज्ञात आहे. शिंदे-फडणवीस सरकारमुळे विकास झाला. मात्र, ठाकरे यांना तो दिसत नाही. उद्धव ठाकरेंनी यांनी हिंदुत्व सोडले नसते, काँग्रेस सोबत गेले नसते तर ते फस्ट्रेट झाले नसते. भगव्या ध्वजाबाबत त्यांनी काढलेले उद्गार त्यांच्या पराभूत मानसिकतेचे द्योतक असल्याचेही ते म्हणाले.

# कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे एका महिन्यात उद्दिष्ट पूर्ण आष्टी ग्रामीण रुग्णालयाची कौतुकास्पद कामगिरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**



आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात नेहमीच विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया व राष्ट्रीय कार्यक्रम राबवून रुग्णसेवा देण्यासाठी तत्पर राहिले आहे. ग्रामीण रुग्णालयात गुरुवार दिनांक १६ मे रोजी बिन टाक्याचे कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेचे भव्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक बडे यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधीक्षक डॉ.राहुल टेकाडे यांच्या नियोजनातून डॉक्टर सावंत,डॉक्टर मस्तुद, डॉक्टर डोंगरे,डॉक्टर ढाकणे, डॉक्टर गुट्टे,डॉक्टर घोडके यांच्या मदतीने अति भव्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. खेड्यापाड्यातून सर्व प्रकारचे लाभार्थी शस्त्रक्रियेसाठी आले होते.सर्व शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या. ग्रामीण रुग्णालय आष्टी साठी दिलेले दीडशे लाभार्थ्यांचे वार्षिक उद्दिष्ट अवघ्या एका महिन्यामध्ये ग्रामीण रुग्णालयाच्या टीमने सहजरित्या पार पाडले.यासाठी येथील सर्व कर्मचारी सिस्टर शेख बेबी, सिस्टर घोडके,मेहरकर,अशोक भुसनर,वैभव ब्रदर,सिस्टर राऊत,सिस्टर बनकर,सिस्टर साळवे,सिस्टर शेख,श्री नरवडे जयचंद,शिपाई भवर प्रतीक सर्व कर्मचारी यांच्या मदतीने हे उद्दिष्ट पार पडले. याबद्दल ग्रामीण रुग्णालयातील सर्व डॉक्टर कर्मचारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

## भाजप ४०० हून अधिक जागा जिंकणार

# आरएसएस-भाजप कधीच वेगळे होऊ शकत नाही-रावसाहेब दानवे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर (वृत्तसंस्था)**

आरएसएस आणि भाजप कधीच वेगळे होऊ शकत नाही. आरएसएसची आमची मातृ संस्था आहे, राजकारणात आम्हाला सल्ला देतील. पण इंटर फेअर करतील असे मुळीच नाही, असे केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे.

दरम्यान रावसाहेब दानवे पुढे बोलताना म्हणाले की, देशात लोकशाही आहे. त्यामुळे मनोज जरांगे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना निवडणूक लढवण्याचा अधिकार आहे. देशातील मतदार राजा हुशार आहे. विधानसभेला उभे राहिले तर त्यावेळेस लोक ठरवतील. जनता कोणाला पाठिंबा देते हे पाहावे लागेल असेही त्यांनी म्हटले आहे.रावसाहेब दानवे म्हणाले की, मनोज जरांगे यांच्यावर एसआयटी नेमली नसून ती घटनेवर होती. जरांगे यांनी मोदींवर केलेली टीका ही भाषण करतानाची होती. जरांगे यांनी कोणाला पाडा सांगितले नव्हते. फडणवीस यांच्यावर टीका केली कारण लाठीहल्ला हा त्यांच्या गृहविभागाने केल्याने तो राग जरांगेंना असेल. मात्र जरांगे यांचा परिणाम कोठेही नाही.लोकसभा निवडणुकीत भाजपला ४०० पेक्षा अधिक जागा मिळतील यात कोणतीच शंका नाही. महाराष्ट्रात देखील महायुतीला ४५ पेक्षा जास्ता जागांवर विजय मिळणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेष आहे, महायुती राज्यात ४५ पेक्षा जास्त जागा जिंकेल, असा विश्वास रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला आहे.रावसाहेब दानवे म्हणाले की, राजकारणात काही होऊ शकते. इंडिया आघाडीला संख्याबळ मिळाले नाही तर काय करणार, असा सवाल पत्रकारांनी रावसाहेब दानवे यांना विचारला. यावर उत्तर देताना, आम्हाला उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्याकडे पाठिंबा मागण्याची वेळ येणार नाही, असे दानवेंनी म्हटले आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४
This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904